वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरुवार दि.१८ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# गेवराईत भरदिवसा तरुणीचे अपहरण

## पोलिसांकडून कारचा पाठलाग, सीसीटीव्हीत थरार कैद

**गेवराई, (दिव्य न्यूज):- शहरातील कायदा-सुव्यवस्थेला हादरवून टाकणारी धक्कादायक घटना गुरुवारी (दि. १८) दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास घडली. गेवराई पंचायत समिती जवळील चौकातून एका तरुणीला जबरदस्तीने उचलून कारमध्ये टाकत अपहरण केल्याची घटना घडल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. दिवसाढवळ्या घडलेला हा थरारक प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, पोलिसांनी तात्काळ कारवाई करत संशयित वाहनाचा शोध सुरु केला आहे.**



संबंधित तरुणी कॉलेजमधून पंचायत समिती जवळील रस्त्याने शास्त्री चौकाच्या दिशेने पायी जात होती. याच वेळी अल्टो कारमधून आलेल्या दोन तरुणांनी अचानक तिच्या दिशेने धाव घेतली. तरुणीने जोरदार प्रतिकार करत आरडा ओरड केला. मात्र आरोपींनी तिला मारहाण करत जबरदस्तीने गाडीत ढकलले आणि घटनास्थळावरून भरधाव वेगात पळ काढला.घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी गाडी अडवण्याचा प्रयत्नही केला मात्र आरोपींनी गाडी न थांबवता शास्त्री चौकातून पुढे शहागडकडे धाव घेतली. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत स्पष्टपणे कैद झाला आहे.घटनेची माहिती मिळताच गेवराई पोलिसांनी तातडीने दखल घेतली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू असून,अपहरणासाठी वापरलेल्या अल्टो कारचा विविध दिशांनी शोध घेतला जात आहे. शहरात व आसपासच्या परिसरात नाकाबंदी करून पोलिसांची शोध मोहीम सुरु आहे.भरदिवसा तरुणीचे अपहरण झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. पोलिसांकडून तपास वेगाने सुरू असून, लवकरच आरोपींच्या मुसक्या आवळल्या जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# रविवारी फैसला

# कोण होईल नगराध्यक्ष अन् कोण होणार नगरसेवक?

## काट्याची टक्कर, काही मतानींच उमेदवार विजयी होणार

### अनेक प्रभागात झाली जबरदस्त टक्कर,निकालानंतर अनेकांना आश्चर्याचा धक्का बसणार

### घड्याळ-तुतारीमध्ये नगरसेवक पदासाठी जबरदस्त लढत, क्रॉस व्होटींगचा अनेकांना बसणार फटका, सर्वच पक्षातील उमेदवारांनी चैन न चालविता क्रॉस मतदान करायला लावले, याचा फटका कोणा कोणाला बसतो हे रविवारीच दिसेल

### शनिवारची रात्र वैऱ्याची, सर्वच उमेदवार म्हणतात मीच एवढया.. मतांनी निवडून येणार



**अनेक प्रभागातून नवीन नवयुवक उमेदवार नगरसेवक होणार**

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

बीड, (दिव्य न्युज):- रविवारी (दि.२१) नगर पालिका निवडणुकीचा दिव्य महासंग्रामचा निकाल लागणार आहे. सकाळी १०.०० वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार आहे. बीडमध्ये मतमोजणी केंद्र कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये होणार असुन प्रशासनातर्फे सर्व तयारी पुर्ण झाली आहे. शनिवारी बीड, परळी मध्ये नगरसेवक पदाच्या काही उमेदवारांची निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. सकाळी ७.३०ते ५.३० पर्यत मतदान होणार असून लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे (दि.२१) रविवारी मतमोजणीला सुरूवात होणार आहे. बीड, गेवराई, माजलगाव, धारूर, अंबाजोगाई, परळी या ठिकाणी मोठी लढत पहायला मिळणार आहे.








बीडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी आणि कमळमध्ये तिरंगी फाईट होणार होणार . गेवराईमध्ये राष्ट्रवादी आणि भाजपमध्ये जोरदार टक्कर पहायला मिळणार असून माजलगावात दोन्ही राष्ट्रवादी मध्ये जबरदस्त फाईट दिसणार आहे. धारूर मध्येही दोन्ही राष्ट्रवादीत टक्कर असून परळीमध्ये महायुती आणि राष्ट्रवादी असा जबरदस्त महासंग्राम दिसून येणार आहे. अंबाजोगाईत दोन्ही उमदेवारांची प्रतिष्ठा पणाला लागली असून कोणाची प्रतिष्ठा राहते अन् कोणाची जाते हे रविवारी ७ ते ८ वाजे पर्यत स्पष्ट दिसून येईल. सर्वच सहाच्या सहा ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादी आणि भाजपामध्ये काट्याची टक्कर पहायला मिळणार आहे. बीडकरांचे सर्वात जास्त लक्ष बीड, गेवराई, माजलगाव आणि परळी या ठिकाणी आहे. या चारही नगर पालिकेत कोण नगराध्यक्ष होणार या कडे सर्व जिल्ह्याचे लक्ष लागून असून सट्टा बाजारातही या चार ठिकाणचा सट्टा जोरदार लागला आहे. बीडमध्ये सर्वच प्रभागात जबरदस्त टक्कर पहायला मिळाली. काही ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादी आमने सामने आहेत तर काही ठिकाणी भाजप,शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादीमध्ये टक्कर पहायला मिळणार आहे. बीड नगर पालिकाची एकूण १३ फेऱ्या होणार आहेत. प्रत्येक फेरीत दोन प्रभागाचा निकाल लागणार आहे. पहिला निकाल प्रभाग क्रं. १ आणि २ चा लागणार असून कोणत्या पक्षाच्या विजयाचा नारळ फुटतो याकडे बीडकरांचे लक्ष लागून आहे. १० वाजता मतमोजणीला सुरूवात झाल्यानंतर अंदाजित ११ वाजेपर्यंत पहिला निकाल हाती येईल.

## प्रस्थापितांना आमच्यासारखी लोकं नको आहेत, त्यामुळेच क्षीरसागर बंधुंकडून षडयंत्र

# शनिवारी होणाऱ्या प्रभाग क्रं. ३ चे मतदान सीसीटिव्हीच्या निगरानीखाली होणार



**बीड (दिव्य न्युज):– गेल्या दोन तीन दिवसांपासून आ. संदीप क्षीरसागर हे माझ्या प्रभागातील मतदारांना उमाकिरण हॉलच्या जवळ कुठेतरी ऑफिस आहे तिथे बोलावून घेऊन धमक्या देत आहेत. मतदानाला १९ आणि २० तारखेला तुम्ही यायचचं नाही अशा प्रकारच्या धमक्या मतदारांना दिल्या जात असल्याचा आरोप प्रभाग क्र.३ ब मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम महायुतीचे उमेदवार अमर नाईकवाडे यांनी माध्यमांशी बोलतांना केला आहे.**

प्रस्थापितांना आमच्यासारखी लोकं नको आहेत, त्यामुळेख क्षीरसागर बंधुंकडून हे षडयंत्र रचले जात आहे. सर्व प्रकारचे हातखंडे वापरूनही सव्र्हेत माझेच नाव पुढे असल्याने आमदारांसह भाजपवाले हताश झाले आहेत, त्यामुळेच शेवटचे अख म्हणून मतदारांना धमक्या देणे, पैसे बाटणे असे प्रकार सुरू आहेत. या संदर्भात मी स्वतः पोलीस अधिक्षक आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे करणार असल्याचेही अमर नाईकवाडे यांनी सांगितले.विरोधकांनी आत्तापर्यंत सर्व गोष्टी करून पाहिल्या आहेत, सगळे पर्याय वापरले. एकच शेवटचा पर्याय जो लोकशाहीला अतिशय मारकल बाधक आहे तो म्हणजे लोकांना दबावात आणायचे. मतदारांवर दाब टाकायचा. तुम्ही मतदानाच्या दोन दिवस आधी इथं दिसलेच नाही पाहिजे. मतदानच करायचं नाही अशा पध्दतीने धमक्या देण्याचं काम विरोधकांकडून सुरू आहे. मी फक्त त्यांना दिलासा देण्यासाठी मतदारांपर्यंत जात आहे. मी आहे, आम्ही आहोत, संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस आहे आणि या जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा आहेत. त्यामुळे दबावाला भिक घालू नका, निर्भयपणे घराबाहेर पडा आणि घडीला मतदान करून अमर नाना नाईकवाडे यांना पुन्हा नगर पालिकेत पाठवा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. अमर नाना अनुभवी नगरसेवक आहेत, एक आदर्श नगरसेवक म्हणून त्यांनी काम केलेले आहे हे कोणीच नाकारू शकत नाही. लोकांसाठी झटणारा, तळमळ असणारा, लोकांमधला सेवक असलेल्या अमरनानांला आपल्याला कसे दाबता येईल याचा अटोकाट प्रयत्न सगळेजण एकत्र येऊन करत आहेत. या भागातील मतदारांनी हे षडयंत्र वेळीच हाणून पाडावे आणि अशा कार्यकर्त्याला आपण जपलं पाहिजे हे सांगण्यासाठीच मी प्रचारात फिरत आहे. दाब–दडप हे फार काळं नसतं, पुर्वीचा काळ आता राहिलेला नाही. निर्भिडपणे मतदानाचा हक्क बजवावा आणि अमर नानांना निवडून द्यावे असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

### अमरनाना सारख्या कार्यकर्त्याला जपा, दबावाला बळी पडू नका, निर्भिडपणे घड्याळीला मतदान करा–आ.विजयसिंह पंडित



अमर नाईकवाडे यांनी गेल्या दिड दशकापासून या भागातील लोकांची सेवा केलेली आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम महायुतीचे उमेदबार अमर नाईकवाडे यांना आम्हाला पुन्हा एकदा येथून संधी द्यायची आहे हा निश्चय मतदारांनी केलेला आहे. मी स्वतः प्रचारात आहे, आवश्यक त्या ठिकाणी गाठीभेटी घेत आहे. मतदानाचा दिवस जसा जसा जवळ येत आहे



### क्षीरसागरांच्या जीवावर आमच राजकारण नाही–नाईकवाडे

तक्रारी माड्या प्रभागातील मतदार खूप स्वाभीमानी आहे, त्यामुळे अशा धमक्या विभवयांना तो भिक घालणार नाही हे आवाचे नाही तर १९८५ पासून क्षीरसागरांनी या प्रभागात त्यांचा नगरसेवक नगरसेवक निवडणूक आणण्याचा केविलवाणा प्रयल केला. मात्र मतदारांनी श्रीरसागरांना थारा दिला नाही. आम्ही प्रमाणिकपणे काम त्यामुळेच आम्ही राजकारणात टिकलो आहोत. श्रीरसागरांच्या जीवावर आमचं राजकारण नाही असेही अमर नाईकवाडेंनी यावेळी ठणकावून सांगितले.

### सारडांना पहिलं मत ही पैसे देऊन विकत घ्यायचयं आणि शेवटचं मत ही पैसे देऊनच विकत घ्यायचयं

आमदार मतदारांना धमक्या देत असतांना जर तुम्हाला मतदान करायचचं असेल तर भाजपचे उमेदवार सारझना मतदान करा लागेल अशा प्रकारचा व्याप टाकत असल्याचा आरोप नाईकवाडे यांनी केला आहे. मुळात तुतारीचा उमेदवार सारडांच्या म्हणण्यावरून आलेला आहे. आमदानी इथे चार लोकांच्या कोपसाला मुळ लावला होता उमेदवाली देखे महणून, सारडांनी त्याच्यावर बोट ठेवलं तोच उमेदवार तिकडून उभा राहिला, गेल्या दोन तीन दिवसांपासून सारदांकडून पैशांचे वाटप सुरू असल्याचे त्या भागातील नागरीकच मला सांगत आहेत. सारडांना पहिलं मतही पैसे देऊन विकत घ्यायचयं आणि शेवटचं मत सुध्दा पैसे देऊनच विकत घ्यायचं असल्याचा आरोप अफर नाईकवाडेंनी केला आहे.

# आ.धनंजय मुंडेंना मंत्रीपद अन् वाल्मिक कराडला जामीन मिळणारच नाही

## खा.बजरंग सोनवणेंची मुंडे–शाह भेटीवर सडेतोड प्रतिक्रिया

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):– राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांची सदनिका घोटाळा प्रकरणातील शिक्षा सत्र न्यायालयानं कायम ठेवल्यानं त्यांच्या राजीनाम्याची चर्चा सुरु आहे. याचवेळी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. यामुळं धनंजय मुंडे यांचं महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कमबॅक होणार अशा चर्चा सुरु झाल्या होत्या. दुसरीकडे वाल्मिक कराड याचा संतोष देशमुख हत्या प्रकरणात जामीन अर्ज फेटाळण्यात आला, यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ना वाल्मिक कराडला जामीन मिळणार, ना धनंजय मुंडे यांना मंत्रिपद मिळणार अशी टीका बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

धनंजय मुंडे मंत्रिमंडळात येणार नाहीत. मी ठाम पणे सांगतो मंत्रिमंडळात त्यांना घेणार नाहीत, त्यांना कुणीही घेणार नाहीत, असं बजरंग सोनवणे यांनी म्हटलं. वाल्मिक कराड याला जामीन मिळणार नाही आणि धनंजय मुंडे यांना कोणीही मंत्रिमंडळात घेणार नाही, अशी टोला देखील बजरंग सोनवणे यांनी लगावला. धनंजय मुंडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या संदर्भात विचारलं असता सोनवणे यांनी ते त्यांच्या पक्षाला आंधारात ठेऊन, मुंबईला चाललो म्हणून दिल्लीला आले आहेत. ते त्यांच्याच पक्षातील नेत्यांना ते अंधारात ठेवतात, अशी टीका सोनवणे यांनी केली. धनंजय मंडे मंत्री होणारच नाहीत, जर तर वर मी बोलणार नाही. मी जबाबदारीने सांगतोय. आता ते महाराष्ट्राच्या, दिल्लीच्या मंत्रिमंडळात पुन्हा दिसणार नाही. त्यांना मंत्री व्हायचं असेल तर अमेरिकेला जावं लागेल, असा टोला देखील बजरंग सोनवणे यांनी लगावला. वाल्मिक कराड याला जामीन होणार नाही, यांना पण मंत्रिपद मिळणार नाही. दोन गोष्टी पक्क्या आहेत, वाल्मिक कराडला जामीन आणि धनंजय मुंडे यांना मंत्रिपद मिळणार नाही, असं बजरंग सोनवणे म्हणाले. सरपंच संतोष देशमुख खून खटल्यातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळला आहे.संतोष देशमुख खून खटल्यात बीडच्या सत्र न्यायालयाने जामीन नाकारल्यानंतर वाल्मीक कराड यांनी औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने सुनावणीअंती सदर प्रकरण जामीन देण्यायोग्य नसल्याने सदर जामीन अर्ज मागे घेता की आदेश पारित करावा, असे कराडच्या वकिलांना केली. वकिलांनी आदेश करण्याची विनंती केली असता उच्च न्यायालयाने वाल्मीक कराडचा जामीन अर्ज फेटाळून लावला.



# अखेर माणिकराव कोकाटे यांनी दिला राजीनामा


## माणिक कोकाटेंच अटक वॉरंट घेवून नाशिक पोलीस मुंबईत



मुंबई (दिव्य न्युज):– मुख्यमंत्री कोट्यातील सदनिका गैरव्यवहार प्रकरणात मंत्री माणिकराव कोकाटे अडचणीत आल्यानंतर आधी त्यांच्याकडून खाती काढून घेतली. राज्य सरकार कोणत्याही प्रकारे सहकार्य करणार नसल्याचे संकेत मिळताच माणिकराव कोकाटे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारल्याचे सांगितले. माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पाठवल्याचेही अजित पवार यांनी सांगितले.

माणिकराव कोकाटे यांच्या अटकेत आता कोणताही कायदेशीर अडथळा नसल्याचे कळते. अटकेसाठी विधिमंडळाच्या कुठल्याही परवानगीची गरज नाही, अशी माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली. तसेच कोकाटे यांच्या अटकेची माहिती पोलीस विधिमंडळाला अवगत करतील, असे सांगण्यात येते. कोकाटे रुग्णालयात दाखल असल्याने पोलिसांसमोर वैद्यकीय अडचण मात्र कायम आहे.

माननीय न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सदस्य व पक्षातील आमचे सहकारी श्री. माणिकराव कोकाटे यांनी आपला राजीनामा माझ्याकडे सुपूर्द केला आहे. कायदे–नियम हे सर्वोच्च स्थानी असून ते कोणत्याही व्यक्तीपेक्षा सर्वोतोपरी आहेत, या आमच्या पक्षाच्या दीर्घकालीन भूमिकेनुसार हा राजीनामा तत्त्वतः स्वीकारण्यात आला आहे. संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाहीसाठी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे पाठवण्यात आला आहे.सार्वजनिक जीवन हे नेहमीच संविधानिक नैतिकता, संस्थात्मक प्रामाणिकता आणि न्यायपालिकेच्या सन्मानावर आधारित असावं, या मूल्यांवर आमच्या पक्षाची निरंतर वाटचाल राहिली आहे. कायदेशीर प्रक्रियेवर आमचा ठाम विश्वास आहे. राज्यात कायदा–व्यवस्थेचं काटेकोरपणे पालन होईल, याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत. लोकशाही मूल्ये जपली जातील व जनतेच्या विश्वासाला तडा जाणार नाही, त्या दृष्टीकोनातून आम्ही सदैव कार्यतत्पर राहू, असे अजित पवार म्हणाले.



अॅड. माणिकराव सरस्वती शिवाजीराव कोकाटे
मंत्री

उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

दिनांक : १८.१२.२०२५

महोदय,

श्री.माणिकराव कोकाटे, मंत्री यांनी जिल्हा व सत्र न्यायालय नाशिक यांनी दिलेल्या निर्णयाचा सन्मान राखून व नैतिक जबाबदारी स्वीकारुन आपल्या मंत्री पदाचा राजीनामा सादर केला आहे. (प्रत सोबत जोडली आहे) तरी त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात यावा, ही विनंती

आपला
(अजित पवार)

प्रति
मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई.

# आ.धनंजय मुंडे भाजपात प्रवेश करणार?

## जवळच्या व्यक्तीचा गौप्यस्फोट, राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

मुंबई , (दिव्य न्युज):– राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अडचणी वाढल्या असतानाच राष्ट्रवादी (अजित पवार गट) नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या दिल्ली दौऱ्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. कोकाटे यांच्याविरोधात नाशिक सत्र न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले असून, त्यांच्या मंत्रिपदावर संकट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे दिल्लीत असल्याच्या बातम्या आणि करुणा मुंडे यांच्या खळबळजनक आरोपांमुळे मुंडे भाजपात प्रवेश करणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

नाशिक सत्र न्यायालयाने सदनिका घोटाळा प्रकरणात माणिकराव कोकाटे यांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा कायम ठेवली असून, त्यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले आहे. कोकाटे यांनी या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली असून, शुक्रवारी (१९ डिसेंबर) सुनावणी होणार आहे. मात्र, तातडीची सुनावणी नाकारल्याने त्यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. यामुळे त्यांचे मंत्रिपद आणि आमदारकी धोक्यात आली आहे.कोकाटे यांच्या संकटानंतर धनंजय मुंडे दिल्ली दौऱ्यावर असल्याची माहिती समोर येत आहे. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याची चर्चा आहे. राजकीय वर्तुळात मुंडे मंत्रीपदाच्या 'घरवापसी'साठी प्रयत्न करत असल्याचा तर्क लढवला जात आहे. मात्र, याबाबत मुंडे किंवा त्यांच्या पक्षाकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.



या सर्व घडामोडींमध्ये करुणा मुंडे यांनी खळबळजनक आरोप केले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, धनंजय मुंडे लवकरच भाजपमध्ये जातील असं वाटतं आहे. त्यांच्यावर अनेक आरोप आहेत, वाल्मिक कराड प्रकरणातही अडचण वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे ते दिल्लीला गेले आहेत. करुणा मुंडे यांनी स्वतः शनिवारी पत्रकार परिषद घेऊन ५० पक्षांना आवाहन करणार असल्याचं सांगितलं आहे.करुणा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यातील वैयक्तिक वाद जुना आहे. करुणा यांनी यापूर्वी मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले असून, न्यायालयातही प्रकरणे सुरू आहेत. त्यामुळे त्यांच्या या विधानाला राजकीयदृष्ट्या फार गांभीर्याने घेतलं जात नाही, मात्र कोकाटे प्रकरण आणि मुंडे यांच्या दिल्ली दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर चर्चांना उधाण आलं आहे.